**नि.फौ.ख.क्र. ६९/२०१३**

**सरकार –वि– रंगनाथ शिंदे**

**निशाणी क्र. ९७**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ ची शपथेवर जबानी.**

नांव – आशा यशवंत शिंदे

वय – ५०

धंदा – शेती

राहणार – वाहेगाव साळ, ता. चांदवड, जि. नाशिक

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. पोलिसांनी माझा दि.१८.०७.२०१३ रोजी जबाब घेतला होता. दि.०२.०७.२०१३ रोजी दुपारी ३:०० वाजेच्या दरम्यान माझे पती व मुलगा शेतामध्ये टोमॅटोचे रोप लावत होते. मी जेवणासाठी दुपारी घरी आले. त्यावेळी आ.क्र. १ ते ५ माझ्या घरासमोर आले व त्यांनी मला, माझे पती व माझ्या मुलाला शिवीगाळ केली. मी त्यांना शिवीगाळ करु नका असे म्हटल्याचा त्यांना राग आला व आ.क्र. २ ने लोखंडी पासाने माझ्या खांद्यावर डाव्या बाजूला व उजव्या बाजूला मारले. आ.क्र. १ ने त्याच्या हातातील गजाने माझ्या पाठीवर व उजव्या पायावर मारले. सागर शिंदेने त्याच्या हातातील विळ्याने माझ्या हाताच्या अंगठ्यावर मारले. आ.क्र. ४ ने त्याच्या हातातील गजाने माझ्या नाकाजवळ, डोक्यावर, कपाळावर मारले. आ.क्र. ३ ने हातातील लाकडी दांड्याने मला पाठीवर, हातावर मारहाण केली. त्यामुळे मी मोठमोठ्याने आरडाओरडा केला.

२. माझा आवाज ऐकून माझे पती व मुलगा सोडवासोडव करण्यासाठी आले असता आ.क्र. १ व आ.क्र. ४ यांनी माझ्या पतीच्या उजव्या हातावर, मांडीवर व कंबरेवर मारहाण केली. आरोपींनी माझा मुलगा प्रशांतचा हात पिरगाळला. त्यामुळे ते दोघे मोठमोठ्याने आरडाओरडा करु लागले. तेथे संजय शिंदे, बाबुराव शिंदे, दिलीप शिंदे, सुराबाई शेख, रंजना शिंदे व मनिषा शिंदे आले व त्यांनी आमची सोडवासोडव केली. आरोपींनी आम्हाला मारहाण केली व ते त्यांच्या घराकडे पळून गेले. सदर लोकांनी आम्हाला

मनमाड–लासलगाव रोडवर नेले व एका गाडीत घालून औषधोपचारासाठी चांदवड येथील सरकारी दवाखान्यात नेले. तेथे माझ्यावर उपचार केले. मला जबर मार लागल्यामुळे पुढील उपचारासाठी नाशिक येथील सरकारी दवाखान्यात पाठवले. आरोपींनी आम्हाला मारहाण केल्यामुळे माझ्या पतीने चांदवड पो.स्टेशनला फिर्याद दिली व पोलिसांनी त्याबाबत माझा जबाब नोंदवला.

३. आरोपींनी ज्या वस्तुंनी आम्हाला मारहाण केली. ते दाखवल्यास मी ओळखू शकते. मला आता आर्टीकल ए कडील पास, आर्टीकल ड कडील लोखंडी गज, आर्टीकल ब कडील विळा, आर्टीकल क कडील काठी दाखवली. ते तेच आहेत. त्यांना मी ओळखते. पोलिसांनी माझा रक्ताचे डाग असलेला आर्टीकल इ कडील ब्लाऊज व परकर जप्त केला होता. तो मला आता दाखवण्यात आला. ते तेच आहेत. मी आरोपींना ओळखते. त्यापैकी आज न्यायालयात आ.क्र. १ व ४ हजर आहेत. त्यांना मी ओळखते. (इतर आरोपींचा गैरहजेरीचा अर्ज आरोपीच्या वकीलांनी दिलेला असून तो अर्ज आरोपींची ओळखत आव्हानित करणार नाही या अटीवर मंजूर करण्यात आला.)

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. आर. पी. ठाकरे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. माझ्या सासऱ्यांचे नाव नामदेव शंकर शिंदे असून त्यांना तीन मुले आहेत. माझ्या सासऱ्यांच्या किती जमिनी आहेत ते मला सांगता येणार नाही. आरोपी व आमचे कुटूंब साधारणतः २५ वर्षांपासून विभक्त राहतो.

माझ्या सासऱ्यांच्या नावे गट नं. १८९, २९३, २९९ या जमिनी होत्या किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. माझ्या सासुबाईचे नाव हौशाबाई नामदेव शिंदे होते. हे म्हणणे खरे आहे की, तिच्या नावावर गट नं. २९९ आहे. माझे माहेर चिंचोले ता. चांदवड आहे. माझ्या वडीलांचे नाव संतू जाधव व माझ्या आईचे नाव पुष्पा जाधव आहे.

५. रामा लुकाजी निकम माझ्या मामाचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांनी आम्हाला व आरोपींना जमिनी वाटून दिल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांनी आम्हाला जमिनी तोंडी वाटपाने

दिल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे व त्यांच्या भावांमध्ये जमिनीवरुन व त्याच्या वाटपावरुन वाद चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, जमिनी एकत्रात असल्यामुळे तुमच्या हिश्याची जमिन तुम्हाला देता येत नाही असे आम्हाला आमचे सासरे सांगत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीचे असे म्हणणे होते की, आम्हाला जशा वाटपाने जमिनी दिलेल्या आहेत. त्यानुसार त्या जमिनी आमच्या नावावर करुन द्या.

६. एकत्र जमिनी असल्यामुळे व त्याबाबत न्यायालयात वाद असल्यामुळे न्यायालयाचा निकाल झाल्याशिवाय तुम्हाला जमिनी वेगळ्या करुन देता येणार नाही असे माझे सासरे माझ्या पतीला सांगत होते किंवा कसे हे मला माहित नाही. माझे वय ५० वर्ष आहे. माझ्या सासुचे वय साधारणतः ८० ते ९० वर्ष आहे. माझ्या पतीने चांदवड न्यायालयामध्ये वाटणीचा दावा दाखल केला होता किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझे पती व मुले असे एकत्र राहतो. आमच्यामध्ये काहीही चर्चा होत नाही. माझ्या पतीमध्ये व माझ्यामध्ये कधीही अशी चर्चा झाली नाही की, माझे सासरे जमिन वाटून देत नसल्यामुळे वाटणीचा दावा न्यायालयामध्ये दाखल करावा लागेल. मी घुले वकीलांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, चांदवड न्यायालयामध्ये माझ्याविरुद्धची केस प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती फिर्याद सन २०१३ ची असून त्यामध्ये मी, रामा लुखा निकम, पुष्पा संतू जाधव, यशवंत नामदेव जाधव आरोपी आहेत. त्या प्रकरणाचा नंबर ११/२०१४ आहे किंवा कसे ते मला सांगता येणार नाही.

**आरोपीच्या वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.27 17:35:26 +0530

**दि. २७.०३.२०२६** **(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**